# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०२/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिंनाक ३०/०१/२०१७ रोजी चे १९.०० ते ३१/०१/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी अविनाश राजकुमार खरोले वय २५ वर्ष, रा. दुर्गा चौक गोरेगाव जिल्हा गोदीया हल्ली मुक्काम विश्वनाथ मेहर यांचे घरी गणेशपुर भंडारा यानी आपली हिरो पॅशन प्रो काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३५ एडी १६८१ कि. ३०,०००/—रु. ची राहात असलेल्या रुमचे बाजुचे खोलीला टेकुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) अवैद्यरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/०१/२०१७ चे २०.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनीक वय ४५ वर्ष, तहसीलदार पवनी यांनी अवैद्य रेतीची वाहतुक करणारे गोसे खुर्द उजव्या कालव्या जवळ आपल्या पथकासह तपासणी करीत असता यातील ६ ट्रक चालकांनी व मालकांनी संगनमत करुन आपआपले ताब्यातील ०६ ट्रकमध्ये एकुण २६ ब्रास रेती किंमती ५२,०००/—रु. चोरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने तसेच वाहन सोडुन चालक व मालक पळुन गेल्याने व पंचनामा करवाहीचे कागदपत्र फिर्यादीने पेश करुन तोंडी दिल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) औषधउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक २०/०१/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील मृतक भौयाजी सुदाम भोतमांगे वय ६२ वर्ष मृतक यांच्या छातीत, पोटात दुखत असल्याने त्यास औषधउपचारा करीता श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २०/०१/०२१७ चे १४.३० वा. चे पुर्वी मरण पावल्याने पोस्टे धंतोली येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. कागदपत्र पास्टे भंडारा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे पोउपनी चाबुकस्वार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**४) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक ३१/०१/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक क्र. एमएच ३६ एच २०३७ चा चालक ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवी. मोवका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ३१/०१/२०१७ चे १७.०० ते १८.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच ४० ए १५४९ चा चालक ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवी. मोवका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदया खाली कारवाई. :—**

दिनांक ३१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ केसेस, तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.